Peer reviewed Journal Impact Factor:5.13 ISSN-2230-9578

# Journal of Research and Development





*Multidisciplinary International Level Referred Journal*

**February-2021. Special Issue-11, Volume-5**



## *Physical and Human Dimensions of Environment, Climate Change, and Sustainable Development*




**Chief Editor**
Dr. R. V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

**Guest Editor**
Dr. Birajdar Govind Dattopant
Principal
Sharadchandra Mahavidyalaya, Shiradhon Tq. Kallam Dist: Osmanabad (Maharashtra)

**Executive Editors**
Dr. A. I. Shaikh
Dr. M. B. Shirmale

Co- Editors
Dr. S. A. Chaus    Dr. Shakeeluddin Khazi    Mr. P. U. Gambhire





**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot,No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102



| | | |
|---|---|---|
| 26 | The Role of Education in Promoting Sustainable Development and Peace<br>**Mr. Ankush Ramchandra Bansode** | 85-90 |
| 27 | Women and Health<br>**Dr.Ayodhya Dattatray Pawal** | 91-93 |
| 28 | United Nations Sustainable Development Goals, Librarian Role, and Challenges in 2021: An overview<br>**G. Srikanth, Dr Pavan kumar** | 94-96 |
| 29 | Sustainable Development and Its Impact on Global Economy<br>**Asst. Prof. Mittha M. S.** | 97-100 |
| 30 | Use of Social Media for Business<br>**Dr. B. S. Sawant** | 101-103 |
| 31 | Corona: A Life Changer<br>**Smt. Shubhada Ramesh Joshi, Saima Firdaus Mohammed Yaseen** | 104-105 |
| 32 | Significance and Conservation of Water<br>**Dr. P. B. Achole** | 106-110 |
| 33 | Restoration and Conservation of Urban Lakes of Latur District (M.S.) India<br>**Dr. Hashmi Irshad Mohiuddin, Dr. S H Gone** | 111-114 |
| 34 | A Study of Production and Export of Grapes in Nashik District<br>**Mr. Khemnar Shashikant Suryabhan** | 115-117 |
| 35 | Women's Empowerment in India: Issues, Challenges<br>**Associate. Prof. Prakash H. Sahare** | 118-121 |
| 36 | भारतीय समाज एंव काव्य में नारी के रूप<br>**प्रा. शफीक लतीफ चौधरी** | 122-124 |
| 37 | साठोत्तरी हिंदी उपन्यासों में विद्रोही प्रेमिका नगरीय परिवेश में<br>**प्रा. डॉ. कदम शिवाजी शेषराव** | 125-127 |
| 38 | राष्ट्रीय टिकाऊ शाश्वत विकास रणनीती<br>**प्रा.जाधव यू. बी.** | 128-129 |
| 39 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिला सक्षमीकरण<br>**प्रा.मिलिंद व्यंकटी घाडगे** | 130-131 |
| 40 | संयुक्त राष्ट्र संघ व शाश्वत विकास<br>**प्रा. डॉ. घोलप कमलाकर गोरख** | 132-134 |
| 41 | वित्तीय समावेशन प्रक्रियेत बँकांची भूमिका<br>**डॉ. दिपक एन. कारे** | 135-138 |
| 42 | जालना जिल्ह्यातील मध्यम जलसिंचन प्रकल्पामुळे कृषिक्षेत्रात झालेला बदल<br>**प्रा.डॉ.पी.के.मोरखंडे** | 139-141 |
| 43 | सामाजिक कल्याणात शारीरिक शिक्षणाची भूमिका<br>**प्रा. डॉ. पडवळ विजय काशिनाथ** | 142-143 |
| 44 | भारतातील स्त्री-पुरुष प्रमाणातील असमतोल<br>**बोधले कविता केरबा** | 144-146 |
| 45 | परळी तालुक्यातील कृषी घनता: एक भौगोलिक अभ्यास<br>श्री. कैलास भास्कर लव्हाळे, डॉ.व्ही.एस.चिमनगुंडे | 147-148 |
| 46 | पिंपरी या गावातील कुटूंब नियोजनाचा - भोगोलिक अभ्यास<br>**डॉ.चिमनगुंडे व्ही.एस.** | 149-153 |
| 47 | जागतिक शांततेसाठी म. गांधीजींच्या विचारांची उपयुक्तता<br>**कु. स्नेहा सोन्याबापू सोळंके** | 154-155 |
| 48 | भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महिलांचे योगदान<br>**प्रा. रघुनाथ व्यंकटी घाडगे** | 156-157 |
| 49 | कोविड-१९ च्या प्रादुर्भावाचा क्रीडाक्षेत्रावर होणाऱ्या परिणामाचा एक अभ्यास.<br>**Dr. Vijay Eknath Somkuwar** | 158-160 |
| 50 | महिला सबलीकरणाची वास्तविकता व उपाययोजना: एक तात्त्विक अभ्यास<br>**डॉ. खलील नबीसाब सय्यद** | 161-163 |
| 51 | पं० दीनदयाल उपाध्याय की सुख सम्बन्धी अवधारणा<br>**समीर कुमार जायसवाल, डॉ० लक्ष्मी गौतम** | 164-166 |
| 52 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जलव्यवस्थापन व जद्यस्थितीतील उपयोगिता एक दृष्टीक्षेप<br>**डॉ. वनमाला आर. तडवी** | 167-169 |
| 53 | महिला सशक्तीकरण और नई पीढ़ी<br>**कु. नेहरकर मंगल रामदास** | 170-172 |

'Journal of Research & Development'
Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor 5.13, ISSN: 2230-9578, February 2021, Special Issue11, Volume-5 "Physical and Human Dimensions of Environment, Climate Change, and Sustainable Development"

# पिपरी या गावातील कुटूंब नियोजनाचा - भोगोलिक अभ्यास

डॉ.चिमनगुंडे व्ही.एस.
संत जनाबाई महाविद्यालय गंगाखेड. ता.गंगाखेड जि.परभणी.

**प्रस्तावना :-**

संततिनियमनास प्रथमतः बऱ्याच राष्ट्रांमध्ये शासकीय विरोध होता व त्याचा प्रचार करण्याविरुद्ध कायदेही संमत करण्यात आले होते. हळूहळू हा शासकीय विरोध कमी होत गेला. प्रचारासाठी शासनांची संमती मिळत गेली व नंतर प्रचारामध्ये शासन स्वतः सहभागी होत गेले. स्वीडनच्या शासनानेच संततिनियमनाच्या प्रसारास प्रथम हातभार लावला व नगरपालिकांच्या संततिनियमन केंद्रांना आर्थिक मदत देऊ केली. इतर राष्ट्रांतील शासनांनीही संततिनियमनाच्या खाजगी संस्थांनी केलेल्या प्रयत्नास सहकार्य दिले. १९५० पासून भारतातही संततिनियमनाच्या प्रयत्नांना सरकारने मदत केली. १९४८ पासून जपानमध्ये गर्भपात कायदेशीर मानला जाऊ लागला व हळूहळू गर्भपाताचे प्रमाण कमी होत जाऊन अन्य मार्गां चा वापर अधिक प्रमाणावर होऊ लागला. अमेरिकेतही १९३० पासूनच संततिनियमनकेंद्रांना सरकारी मदत मिळू लागली. १९६४ मध्ये अमेरिकेने इतर राष्ट्रांना संततिनियमनाविषयी आणि कुटुंबनियोजनाबद्दल तांत्रिक मदत देण्यास सुरुवात केली व १९६७ नंतर अमेरिकेची आर्थिक मदत संततिनियमनाची साधने पुरविण्यासाठी दिली जाऊ लागली. रशियामध्ये गर्भपाताचा विशेष अवलंब केला जात असला, तरी अलीकडे गर्भपाताऐवजी संततिनियमनाच्या इतर उपायांची अधिक शिफारस करण्यात येत आहे. चीनमध्ये साम्यवादी शासनाने सुरुवातीस जरी लोकसंख्या वाढावी म्हणून संततिनियमनास विरोध दर्शविला, तरी १९६० नंतर संततिनियमनाच्या प्रयत्नास शासकीय दुजोरा मिळू लागला. संयुक्त राष्ट्रांचासुद्धा संततिनियमनाच्या प्रयत्नांवर विशेष भर आहे.

**संततिनियमनाचा इतिहास :-**

संततिनियमनाच्या विविध साधनांचा वापर फार प्राचीन काळापासून होत आला आहे. ख्रिस्तपूर्व १८५० ते १५५० या काळातील काही ईजिप्शियन लेखांतून व प्राचीन हिब्रू वाङ्मयातून गर्भधारणा टाळण्याच्या अनेक उपायांचा उल्लेख आढळतो. ख्रिस्तपूर्व चौथ्या शतकात ॲरिस्टॉटल याने गर्भाविरोधाच्या उपायांचे वर्णन केलेले आहे. त्याचप्रमाणे इ. स. दुसऱ्या शतकात सोरेनस या प्रसूतिशास्त्रवेत्त्याने संततिनियमनाच्या पद्धतीचे सविस्तर विवेचन करून गर्भपाताऐवजी गर्भधारणा टाळणे हा अधिक श्रेयस्कर मार्ग होय, यावर भर दिला. ग्रीक व रोमन काळांत स्त्रियांचे आरोग्य सुरक्षित राखण्याच्या दृष्टीने गर्भाविरोधास विशेष महत्त्व दिले जाई; परंतु गर्भसंभव टाळण्याच्या पद्धतींचा अवलंब फारच थोड्या नागरिकांना करता येत असे. गर्भाविरोधाच्या तंत्राचा सार्वजनिक प्रसार मात्र एकोणिसाव्या शतकापर्यंत झाला नव्हता.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :-**

१) लोकसंख्या विषयक धोरणाचा नेसर्गिक घटकावरील परिणामाचा अभ्यास करणे .

२) अभ्यास क्षेत्रातील कुटूंब नियोजन नियोजनाचा अभ्यास करणे .

३) कुटूंब नियोजनाचा सामाजिक व आर्थिक विकासावरील परिणामाचा अभ्यास करणे.

**माहिती स्तोत :-**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी माहिती मिळवण्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरूपातील माहीति स्त्रोताच्या उपयोग केला जाणार आहे .प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी सर्वेक्षण मुलाखत व प्राश्नावली. चा उपयोग करण्यात आला आहे .लातूर जिल्ह्यातील मुख्य चिकित्सा अधिकारी,उप मुख्य चिकित्सा अधिकारी ,मेडिकल ऑफिसर अशा कुटूंब नियोजन संदर्भातील अधिकारी याच्या मुलाखती घेऊन प्राथमिक स्वरूपाची माहिती घेण्यात आली.

**विषय विवेचन :-** प्रस्तुत विषय विवेचनात कुटूंब नियोजनाचा अभ्यास करण्यात आला आहे त्यामध्ये लातूर जिल्ह्यातील कुटूंब नियोजनाचे सर्वेक्षण करताना पिपरी या गावातील कुटूंबाचे सर्वेक्षण करण्यात आले.त्यानुसार माहितीचे विश्लेषण

**पिपरी :- ( Pipari )**

**प्राकृतिक स्वरूप :-** लातूर जिल्ह्यातील उदगीर तालुक्यातील पिपरी हे गाव बालाघाट रागांच्या पायथ्याशी वसलेले आहे हा भाग ५०० मी.उंचीपेक्षा कमी उंची असणाऱ्या प्रदेशात येतो.या गावाची स्थान निश्चिती १८.४३' २३.९ " उत्तर अक्षांश व ७७.०८'००.९" पूर्व रेखांश आहे. या गावाचे क्षेत्र ८०६.९६ चो.हेक्टर.असून घराची संख्या ३१९ इतकी आहे.या गावाची कृषी प्रधान अर्थ व्यवस्था आहे. या गावात पिपरी सिचन प्रकल्पामुळे संपूर्ण जमीन हि ओलिताखाली आली आहे .येथील जमीन हि


काही सुपीक व कसदार आहे तर काही डोंगर पायथ्याशी उतारानुसार लाल मृदा दिसून येते.तरीही संपूर्ण क्षेत्रात बागायती शेती केली जाते.जास्ती प्रमाणात ऊस या पिकाचे क्षेत्र आहे. हवामान ऋतूनुसार शुष्क व कोरडे असते.

**सांस्कृतिक स्वरूप :-** २०११ च्या जनगणनेनुसार येथील लोकसंख्या १८१६ ( २०१८-१९ मध्ये लोकसंख्या २०१६ असून यात पुरुष १०९६ तर स्त्रियांची संख्या ९२० इतकी आहे.) (Censas MIDDS Code.no. :- 561007).या मध्ये ७६ % लोक हे हिंदू धर्माचे आहेत तर २४ % लोक हे इतर धर्माचे आहेत.आज म्हणजे २०१८-२०१९ सर्वेक्षणानुसार इतर धर्माची लोकसंख्या हि जवळपास २६ % पर्यंत झाली आहे . या गावाची साक्षरता सरासरी ८० % दिसून येते. यात पुरुषाची साक्षरता जवळपास ९० % इतकी आहे.स्त्रियांची साक्षरता प्रमाण कमी दिसून येते. येथील प्राथमिक आरोग्य केंद्र नळगीर असून या गावात दर महिन्याच्या तिसऱ्या बुधवारी लसीकरण घेतले जाते. आरोग्याच्या व इतर कुटूंब नियोजनाच्या माहिती मोहीम हि डोर टू डोर या माध्यमातून आशा कार्यकर्ता व अंगणवाडी सेविका या सतत करत असतात. काही अडचण निर्माण झाल्यास ते महाराष्ट्र आरोग्य विभागाचा संपर्क क्रमांक १०४ या वर संपर्क करतात.पिपरी या गावाची सर्वेक्षणातून जी परिस्थिती समोर आली त्या नुसार गावातील १०० कुटूंबाचे प्रश्नावली च्या माध्यमातून सर्वेक्षण केले त्या मध्ये ६० कुटूंब हिंदू धर्माचे, १० कुटूंब मुस्लीम धर्माचे, ३० कुटूंब नवं बौध्द व बौध्द धर्माचे आचरण करणारे आहेत.एकूण कुटूंब संख्येच्या जवळपास ३३% कुटूंबाचे या दरम्यान सर्वेक्षण घेण्यात आले आहे.

**कुटूंबाचे प्रश्नावली च्या माध्यमातून सर्वेक्षण ( टक्केवारी )**

| अ.क्र. | कुटूंबाचा धर्म | कुटूंबाची संख्या | कुटूंब नियोजनाचा वापर करणारे कुटूंब | | गर्भ निरोधकांचा वापर करणारे कुटूंब | | नसबंदी केलेले कुटूंब | | नसबंदी करण्याचा विचार करणारे कुटूंब | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| १ | हिंदू | ६० | ५२ | ८६ | ६० | १०० | ४२ | ७० | १८ | ३० |
| २ | मुस्लीम | १० | ०२ | २० | ०५ | ५० | ०१ | १० | ०२ | २० |
| ३ | बौध्द | ३० | १८ | ६० | २८ | ९३.३ | २४ | ८० | ०६ | २० |

**( माहिती स्तोत्र :- सर्वेक्षणाच्या माध्यमातून )**




**( आलेख -१ )**

लातूर जिल्ह्यातील पिपरी या गावाचे सर्वेक्षण केल्यावरून हिंदू धर्मातील ज्या ६० कुटूंबाचे सर्वेक्षण केले त्यामध्ये ५२ कुटूंब हे कुटूंब नियोजनाचा वापर करणारे दिसून येतात तर ६० म्हणजे संपूर्ण कुटूंब हे गर्भ निरोधकांचा यात ( निरोध,गर्भ निरोध गोळ्या,तांबी,फेस येणाऱ्या गोळ्या,काही नेसर्गिक पद्धत,काही आत्मसंयम.इत्यादी.) वापर करणारे दिसून आले.आणि ४२ कुटूंब हे नसबंदी केलेले व १८ कुटूंब हे नसबंदीचा विचार करणारे आहेत.तर मुस्लीम धर्माचे १० कुटूंबाचे सर्वेक्षण केले यात ०२ कुटूंब हे कुटूंब नियोजनाचा वापर करणारे दिसून येतात तर ०५ कुटूंब हे गर्भ निरोधकांचा यात ( निरोध,गर्भ निरोध गोळ्या,तांबी,फेस येणाऱ्या गोळ्या,काही नेसर्गिक पद्धत,काही आत्मसंयम.इत्यादी.) वापर करणारे दिसून आले.आणि ०१ कुटूंब हे नसबंदी केलेले व ०२ कुटूंब हे नसबंदीचा विचार करणारे आहेत. आणि बौध्द धर्माचे ३० कुटूंबाचे सर्वेक्षण केले यात १८ कुटूंब हे कुटूंब नियोजनाचा वापर करणारे दिसून येतात तर २८ कुटूंब हे गर्भ निरोधकांचा यात ( निरोध,गर्भ निरोध गोळ्या,तांबी,फेस येणाऱ्या गोळ्या,काही नेसर्गिक पद्धत,काही आत्मसंयम.इत्यादी.) वापर करणारे दिसून आले.आणि २४ कुटूंब हे नसबंदी केलेले व ०६ कुटूंब हे नसबंदीचा विचार करणारे आहेत.


पिपरी या गावातील घेतलेल्या सर्वेक्षणातून जी टक्केवारी मिळालेली आहे. त्या मध्ये हिंदू धर्मामध्ये ८६ % कुटूंब हे कुटूंब नियोजनाचे वापर करणारे आहेत.१०० % कुटूंब हे गर्भ निरोधकांचा वापर करणारे दिसून येतात. ७० % कुटूंब हे नसबंदी करणारे आहेत.व ३० % कुटूंब हे नसबंदी करण्याच्या विचाराचे आहेत. तर मुस्लीम धर्मामध्ये २०% कुटूंब हे कुटूंब नियोजनाचे वापर करणारे आहेत. ५० % कुटूंब हे गर्भ निरोधकांचा वापर करणारे दिसून येतात.१० % कुटूंब हे नसबंदी करणारे आहेत.व २० % कुटूंब हे नसबंदी करण्याच्या विचाराचे आहेत. व बौध्द धर्मामध्ये ६० % कुटूंब हे कुटूंब नियोजनाचे वापर करणारे आहेत. ९३.३ % कुटूंब हे गर्भ निरोधकांचा वापर करणारे दिसून येतात. ८० % कुटूंब हे नसबंदी करणारे आहेत.व २० % कुटूंब हे नसबंदी करण्याच्या विचाराचे आहेत.

यावरूनच तीनही धर्मांचा विचार व यावरून पिपरी गावाची लोकसंख्या विचारात घेतल्यास अलीकडील काळात हिंदू व बौध्द धर्माची संख्या कमी वाढ दिसते तर मुस्लीम धर्माची संख्या हि काहीशी वाढलेली दिसते.

**कुटूंब नियोजनामुळे आर्थिक स्तर ( टक्केवारी )**

| अ.क्र. | कुटूंबाचा धर्म | कुटूंबाची संख्या | कुटूंब नियोजनामुळे उच्च आर्थिक स्तर असणारे कुटूंब | | कुटूंब नियोजनामुळे मध्यम आर्थिक स्तर असणारे कुटूंब | | कुटूंब नियोजनामुळे सामान्य आर्थिक स्तर असणारे कुटूंब | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| १ | हिंदू | ६० | १८ | ३० | ३० | ५० | १२ | २० |
| २ | मुस्लीम | १० | ०१ | १० | ०५ | ५० | ०४ | ४० |
| ३ | बौध्द | ३० | ०४ | १३.३ | १० | ३३.३ | १६ | ५३.३ |

**( माहिती स्तोत्र :- सर्वेक्षणाच्या माध्यमातून )**




**( आलेख -२ )**


सर्वेक्षण केलेल्या कुटूंबाचे आर्थिक स्तर वरून विवेचन केल्यास हिंदू धर्माचा ६० कुटूंब पैकी १८ कुटूंबाची आर्थिक स्तर उच्च दिसून येतो. ३० कुटूंबाचा आर्थिक स्तर मध्यम दिसून येतो.तर १२ कुटूंबाचा आर्थिक स्तर सामान्य दिसून येतो.तसेच मुस्लीम धर्माच्या आर्थिक स्तराचे विवेचन १० कुटूंब पैकी ०१ कुटूंबाची आर्थिक स्तर उच्च दिसून येतो. ०५ कुटूंबाचा आर्थिक स्तर मध्यम दिसून येतो.तर ०४ कुटूंबाचा आर्थिक स्तर सामान्य दिसून येतो.आणि बौध्द धर्माचे आर्थिक स्तराचे विवेचन ३० कुटूंब पैकी ०४ कुटूंबाची आर्थिक स्तर उच्च दिसून येतो. १० कुटूंबाचा आर्थिक स्तर मध्यम दिसून येतो.तर १६ कुटूंबाचा आर्थिक स्तर सामान्य दिसून येतो.यावरूनच असे दिसून येते कि ज्या धर्मात कुटूंब नियोजनांचे योग्य नियोजन करण्यात आले आहे.त्या कुटूंबाचे आर्थिक स्तर वाढलेला दिसून येतो. सर्वेक्षण केलेल्या कुटूंबाचे आर्थिक स्तर वरून विवेचन केल्यास हिंदू धर्माचा ६० कुटूंब पैकी ३०% कुटूंबाचा आर्थिक स्तर उच्च दिसून येतो.५० % कुटूंबाचा आर्थिक स्तर मध्यम दिसून येतो.तर २० % कुटूंबाचा आर्थिक स्तर सामान्य दिसून येतो.तसेच मुस्लीम धर्माच्या आर्थिक स्तराचे विवेचन १० कुटूंब पैकी १० % कुटूंबाची आर्थिक स्तर उच्च दिसून येतो. ५० % कुटूंबाचा आर्थिक स्तर मध्यम दिसून येतो.तर ४० % कुटूंबाचा आर्थिक स्तर सामान्य दिसून येतो.आणि बौध्द धर्माचे आर्थिक स्तराचे विवेचन ३० कुटूंब पैकी १३.३ % कुटूंबाची आर्थिक स्तर उच्च दिसून येतो. ३३.३ % कुटूंबाचा आर्थिक स्तर मध्यम दिसून येतो.तर ५३.३ % कुटूंबाचा आर्थिक स्तर सामान्य दिसून येतो.यावरूनच असे दिसून येते कि ज्या धर्मात कुटूंब नियोजनांचे योग्य नियोजन करण्यात आले आहे.त्या कुटूंबाचे आर्थिक स्तर वाढलेला दिसून येतो.

कुटूंब नियोजनामुळे सामाजिक स्तर ( टक्केवारी )

| अ.क्र. | कुटूंबाचा धर्म | कुटूंबाची संख्या | कुटूंब नियोजनामुळे उच्च सामाजिक स्तर असणारे कुटूंब | | कुटूंब नियोजनामुळे मध्यम सामाजिक स्तर असणारे कुटूंब | | कुटूंब नियोजनामुळे सामान्य सामाजिक स्तर असणारे कुटूंब | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| १ | हिंदू | ६० | १६ | २६. ६ | ३२ | ५३.३ | १२ | २० |
| २ | मुस्लीम | १० | ०१ | १० | ०५ | ५० | ०४ | ४० |
| ३ | बौध्द | ३० | ०५ | १६. ६ | ०८ | २६. ६ | १७ | २८. ६ |

( माहिती स्तोत्र :- सर्वेक्षणाच्या माध्यमातून )

( आलेख -३ )




सर्वेक्षण केलेल्या कुटूंबाचे सामाजिक स्तर वरून विवेचन केल्यास हिंदू धर्माचा ६० कुटूंब पैकी १६ कुटूंबाची सामाजिक स्तर उच्च दिसून येतो. ३२ कुटूंबाचा सामाजिक स्तर मध्यम दिसून येतो.तर १२ कुटूंबाचा सामाजिक स्तर सामान्य दिसून येतो.तसेच मुस्लीम धर्माच्या सामाजिक स्तराचे विवेचन १० कुटूंब पैकी ०१ कुटूंबाची सामाजिक स्तर उच्च दिसून येतो. ०५ कुटूंबाचा सामाजिक स्तर मध्यम दिसून येतो.तर ०४ कुटूंबाचा सामाजिक स्तर सामान्य दिसून येतो.आणि बौध्द धर्माचे सामाजिक स्तराचे विवेचन ३० कुटूंब पैकी ०५ कुटूंबाची सामाजिक स्तर उच्च दिसून येतो. ०८ कुटूंबाचा सामाजिक स्तर मध्यम दिसून येतो.तर १७ कुटूंबाचा सामाजिक स्तर सामान्य दिसून येतो.

सर्वेक्षण केलेल्या कुटूंबाचे सामाजिक स्तर वरून विवेचन केल्यास हिंदू धर्माचा ६० कुटूंब पैकी २६. ६ % कुटूंबाचा सामाजिक स्तर उच्च दिसून येतो. ५३.३ % कुटूंबाचा सामाजिक स्तर मध्यम दिसून येतो.तर २० % कुटूंबाचा सामाजिक स्तर सामान्य दिसून येतो.तसेच मुस्लीम धर्माच्या सामाजिक स्तराचे विवेचन १० कुटूंब पैकी १०% कुटूंबाची सामाजिक स्तर उच्च दिसून येतो. ५० % कुटूंबाचा सामाजिक स्तर मध्यम दिसून येतो.तर ४० % कुटूंबाचा सामाजिक स्तर सामान्य दिसून येतो.आणि बौध्द धर्माचे सामाजिक स्तराचे विवेचन ३० कुटूंब पैकी १६. ६ % कुटूंबाची सामाजिक स्तर उच्च दिसून येतो. २६. ६ % कुटूंबाचा सामाजिक स्तर मध्यम दिसून येतो.तर २८. ६ % कुटूंबाचा सामाजिक स्तर सामान्य दिसून येतो. यावरूनच असे दिसून येते कि ज्या धर्मात कुटूंब नियोजनांचे योग्य नियोजन करण्यात आले आहे.त्या कुटूंबाचे सामाजिक स्तर वाढलेला दिसून येतो.

पिपरी या गावाची सर्वेक्षण अंतर्गत असे दिसून आले की ज्या कुटूंबाची संख्या कमी अशा कुटूंबाची आर्थिक व सामाजिक सधनता दिसून येते.या गावात मुस्लीम धर्मीय संख्या कमी प्रमाणात आहे.( फक्त ११ घरे ) पण काही हिंदू व बौध्द धर्मीय लोक ज्याची कुटूंब सदस्य संख्या जास्त म्हणजेच कुटूंब नियोजनाचा वापर कमी किंवा करण्यास वेळ घेतल्या मुळे सदस्य संख्या जास्त आणि कुटूंबाचे आर्थिक नियोजन कोलमोडलें यातूनच सामाजिक नियोजन सुद्धा कमी झाले.याचाच परिणाम म्हणजे लोकसंख्या वाढ परिणामी भोगोलिक परिस्थितीवर विपरीत परिणाम झालेला दिसून येतो.

**निष्कर्ष** :-

१) ज्या कुटूंबाने कुटूंब नियोजन केले त्याचे आर्थिक व सामाजिक स्तर सुधारलेला दिसून येतो.

२) कुटूंबाची संख्या हि त्याच्या प्रत्येक घटकावर परिणाम करते.

३) सर्वेक्षित कुटूंबाचे आकलन केल्यास गावातील लोकसंख्या वाढीचे आकलन होते.

४) विवेचनातून कोणत्या घटकावर अधिक भर देण्याची गरज आहे याचे आकलन होते.

५) यावरून जिल्ह्यातील लोकसंख्याचे विभाग निहाय आकलन होते.

संदर्भ सूची :-

१) जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन ( २०११ ते २०१८ )
२) लोकसंख्या भूगोल ( डॉ.शेटे ,डॉ.शहापूरकर ,डॉ .सुरेश फुले )
३) लोकसंख्या भूगोल ( डॉ.घारपुरे विठ्ठल )
४) population Geography ( ए.बी.सवंदी )
५) दुबे एस .पी.मिश्रा राम बाबू " जनांकिकी एंव जनसंख्या अध्ययन "
६) Agarwala S.N.(1978 ) " Indai's population problems "
७) भारत (२०१५ ) "जनसंख्या " प्रकाशन विभाग सूचना ओर प्रसारण मंत्रालय नई दिल्ली .